# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

- **(क) तारांकित प्रश्न**
- **(ख) सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी पटलावर ठेवणे.**
- **(ग) अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी व नववी यादी पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** : "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१७-१८, सन १०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री** :

**(क)** "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : "शासनाच्या नगरविकास विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमीविषयीचे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

अमुद्रित प्रत

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २** वर **कृषी मंत्री** निवेदन करतील :-

"मराठवाड्यात पेरणी योग्य पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांना तात्काळ मदत करण्याबाबत."

(२) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स**. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १** वर **मदत व पुनर्वसन मंत्री** निवेदन करतील :-

"मौजे कारंडवाडी (देगाव, ता. जि. सातारा) गावाच्या हद्दीत ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होऊन झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत."

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना अनुक्रमांक (१) ते (८) आजच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या नाहीत.)**

**(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) – [अनुक्रमांक (१)] –**

(१) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातर्फे जे कामगार मंडळाचे सदस्य आहेत अशा कामगारांसाठी मध्यान्ह भोजन देण्याचा निर्णय घेण्यात येणे, या कामगारांना शासनातर्फे मोफत पोटभर भोजन देण्याची व्यवस्था असून कामगारांना मोफत भोजन देण्यात येत असणे, या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून ज्या कामगारांनी नोंदणी केलेली आहे अशा कामगारांना दोन्ही वेळेचे मोफत भोजन न देता काही ठिकाणी ऊसतोड कामगाराचे बनावट नावे देऊन केलेला भ्रष्टाचार, जळगाव जिल्हयात या योजनेचे तब्बल ४७,००० बोगस लाभार्थी दाखवून होत असलेला कोट्यवधीचा गैरव्यवहार, एकटया जळगांव जिल्हयात सप्टेंबर, २०२२ ते एप्रिल, २०२३ दरम्यान ५४ कोटीची बोगस बिले काढणे, जळगाव व शहर परिसरातील

अग्रिम प्रत

गावांमध्ये या योजनेस कामगारांची बनावट यादी देण्यासाठी काही राजकीय पक्षांशी संबंधित कार्यकर्ते या कार्यक्रमात बोगस बनावट कामगारांची नोंदणी करीत असून राज्यातील हा सर्वात मोठा घोटाळा असल्यामुळे या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबतची यादी पुरविणारे एजंट सक्रीय असणे, जळगाव जिल्हयात या योजनेसाठी सरसकट मतदार यादीच जोडण्यात येणे, जेवणाच्या यादीत अनेक प्रतिष्ठीत व मयत लोकांची यादी जोडणे, भुसावळ रस्त्यावरील गेल्या अनेक वर्षापासून सुरु असलेल्या एका बांधकाम साईटवर दिडशेपेक्षा जास्त कामगारांना जेवण दिल्याचा दावा करण्यात येत असणे, दिननगर येथील औष्णिक वीज केंद्रात दररोज २००० कामगारांना दोन्ही वेळेचे जेवण दिल्याचे दाखवून बोगस बिले काढणे, २५९ दिवसात एकही कामगार गैरहजर नसल्याचे दाखविणे, प्रत्यक्षात फक्त ३८ डबे पुरविण्याचे सिध्द होणे, परंतु येथील सर्व मजूर घरुन स्वत:चे भोजन सोबत आणत असून ते या योजनेचा लाभ घेत नसल्याची बाब उघडकीस आलेली असणे, राज्यात या योजनेत कोट्यवधीचा गैरव्यवहार होत असल्याची शक्यता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यासह देशात घरोघरी देवांच्या मुर्तींचे पूजन केले जात असून विधीवत त्याचे विसर्जन जलाशयात केले जात असणे, रायगड जिल्हयातील पेण, हमरापूर हे गणेश मुर्तींचे माहेरघर समजले जात असणे, महाराष्ट्रात कोकणासह, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह देश विदेशात या मुर्तींची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असणे, या वर्षी दिनांक १९ ते २८ सप्टेंबर, २०२३ रोजी गणेशोत्सव महाराष्ट्रासह देश विदेशात साजरा होत असणे, परंतु केंद्र शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तीवर बंदी घातली असल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पेण, पनवेल, हमरापूर अशा विविध ठिकाणी असणाऱ्या मुर्तीकारांचे रोजगार व दैनंदिन उपजिवीकेवर त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, येत्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या घरगुती गणेशमुर्तीवर बंदी घालण्याचा निर्णय नुकताच मुंबईसह राज्यातील इतर महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केला असणे, या निर्णयाला मूर्तिकारांकडून व मूर्तिकार संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, गणेशोत्सव हा महत्त्वाचा मोठा पारंपरिक उत्सव असून यासाठी लागणाऱ्या पीओपी मूर्ती बनवण्याच्या व्यवसायावर अनेक कुटुंबे अवलंबून असणे, सबब राज्य सरकारच्या वतीने नेमण्यात आलेल्या तांत्रिक समितीचा अंतिम अहवाल येत नाही तोपर्यंत पीओपीच्या मूर्तीवर सरसकट बंदी घालणे अशास्त्रीय, असंविधानिक आणि अयोग्य ठरेल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"इंडिक टेल्स व हिंदू पोस्ट या वेबसाईटवर स्त्री शिक्षणाच्या जनक आद्यसमाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी अत्यंत खालच्या पातळीचे लिखाण करण्यात आलेले असणे, या लेखातील भाषा अत्यंत अपमानास्पद असून याचा धिक्कार राज्यातील सर्व स्तरातून होत असणे, स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले असून शिक्षण देत असताना २० व्या शतकातील काही जातीय व्यक्तींकडून त्यांच्यावर दगडधोंडे व शेणाचा मारा त्यांनी अंगावर झेललेला असणे, २१ व्या शतकात देखील काही जातीयवादी शक्ती पुन्हा एकदा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंवर चिखलफेक करीत असून या पोर्टलवर ‘इतिहासाची पुनर्मांडणी’ या नावाखाली इतिहासाची अक्षरश: मोडतोड सुरु असून ही समाजविघातक वृत्ती ठेचण्याची होत असलेली मागणी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविरोधात आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्या ‘इंडिक टेल्स’ व ‘हिंदू पोस्ट’ या वेबसाईट तात्काळ बंद करुन वेबसाईट चालविणाऱ्या व लिखाण प्रसार करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबत बऱ्याच लोकप्रतिनिधींनी मुंबईचे पोलिस आयुक्त यांची भेट घेऊन देण्यात आलेले निवेदन, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सचिन अहिर,** शशिकांत शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील आयुर्वेदिक कॉलेजमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम (एमडी, एमएस) आयुर्वेद प्रवेशासाठी मराठी विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय, यासंदर्भात विद्यार्थी व लोकप्रतिनिधी यांनी माहे मे व जून, २०२३ मध्ये शासनाला दिलेली लेखी निवेदने, फक्त महाराष्ट्र राज्यातून पदवी घेणाऱ्यांनाच राज्य राखीव जागातून प्रवेश देणे, मात्र मूळ महाराष्ट्रीयन विदयार्थ्यांनी केवळ राज्याबाहेरून पदवी घेतल्याने स्टेट कोट्यातून प्रवेश नाकारणे, त्यामुळे त्यांना केवळ १५ टक्के जागा उपलब्ध होणे, सन २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षात एमडी आयुर्वेदच्या ८४९ जागा रिक्त ठेवून इच्छुक मराठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे, आयुष मंत्रालय भारत सरकारने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी सूचनेव्दारे ८५ टक्के जागांबाबत नियम करण्याचे राज्य सरकारला दिलेले अधिकार, कर्नाटक व मध्यप्रदेशने तेथील मूळच्या विदयार्थ्यांना स्टेट कोट्यातून प्रवेश देण्यासाठी केलेले नियम, महाराष्ट्र राज्य सरकार नियमात सुधारणा करण्याबाबत करीत असलेली टाळाटाळ, शासन कारवाई करीत नसल्याने आयुर्वेद विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष यावर शासनाकडे तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(५) **श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत ब्रेन डेड रूग्ण किंवा जिवंत व्यक्ती यांच्याकडून अवयवदान घऊन राज्यात अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पाडण्यात येत असणे, ब्रेन डेड रूग्णाकडून अवयवदान मिळण्याकरिता संबंधित रूग्णांच्या नातेवाईकांना झोनल ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटीकडे नोंदणी करणे आवश्यक असणे, तसेच सद्य:स्थितीत मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत जिवंत व्यक्तीकडून अवयवदान स्विकारताना सदरहू जिवंत व्यक्ती संबंधित रूग्णाचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी असणे आवश्यक तथा बंधनकारक असणे, जिवंत व्यक्तीकडून सदरहू कायद्याच्या अंतर्गत अवयवदान संपन्न होण्यासाठी संबंधित रूग्णालयातील स्थानिक प्राधिकरण समिती )LOCAL AUTHORISATIONS COMMITTEE) समोर संबंधित रूग्णाला / नातेवाईकांना त्यांचे प्रकरण सादर करून रूग्णाचे व अवयव दात्याचे नाते प्रस्थापित करणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच रूग्णांमध्ये व अवयव दात्यांमध्ये कोणत्याही स्वरूपाची आर्थिक देवाण घेवाण होत नाही, इत्यादी बाबतची पडताळणी प्रक्रिया पार पाडावी लागत असणे, बहुतांशवेळा संबंधित रूग्णाचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी यांच्यापैकी कोणीही अवयवदान करण्यास उपलब्ध नसल्यास अथवा वैद्यकीय निकषांवर पात्र नसल्यास आणि संबंधित रूग्णाचे अन्य नातेवाईक अवयवदान करण्यास इच्छुक / उपलब्ध असल्यास केवळ मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत असलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने लोकल ऑथोरायझेशन कमिटीला याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याने अशा रूग्णांना अनेक वर्षे ब्रेन डेड रूग्णांकडून अवयवदान मिळण्याच्या प्रक्रियेकडे वाट पहावी लागत असणे, तसेच लोकल ऑथोरायझेशन कमिटीने एखादे प्रकरण नामंजूर केल्यास संबंधित रूग्णाचे नातेवाईकांना अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दाद मागता येत असणे, तथापि अपिलीय प्राधिकारी यांना मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत त्यांच्या सांविधानिक पदास मर्यादित अधिकार असल्याने बहुतांशी प्रकरणात लोकल ऑथोरायझेशन कमिटीचाच निर्णय कायम ठेवण्यात येत असणे, त्यानंतर रूग्णाचे नातेवाईक जरी मा.उच्च न्यायालयात दाद मागू शकत असले तरी त्यामध्ये अनिश्चित कालावधी लागत असल्याने व अवयव प्रत्यारोपणासंबंधीचा निर्णायक कालावधी वाया जात असल्याने या प्रकरणी संबंधित रूग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांना अतोनात मानसिक, शारिरीक व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, सदरहू बाब लक्षात घेता या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे एक निवृत्त न्यायाधीश तसेच एक निवृत्त प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी व मानवी

अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण या विषयातील एका ज्येष्ठ तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या एका त्रिसदस्यीय आयोगाची स्थापना केल्यास सदरहू बाब उपयुक्त ठरणे, या आयोगाने त्रैमासिक पध्दतीने त्यांच्यासमोरील सादर प्रकरणांची नियमितपणे सुनावणी घेतल्यास व सदरहू आयोगास निर्णय घेण्याच्या अनुषंगाने राज्य गुप्तचर विभाग किंवा अवयव प्रत्यारोपणासंबंधीच्या शासकीय यंत्रणेचे सहाय्य दिल्यास या प्रकरणी अनेक गरजू रूग्णांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण होणे, सबब अशा आयोगाची निर्मिती करण्याबाबत व तसेच अवयवदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या ज्या रूग्णांचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी यांच्यापैकी कोणीही अवयवदान करण्यास उपलब्ध नसल्यास अथवा वैद्यकीय निकषांवर पात्र नसल्यास संबंधित रूग्णाचे अन्य इच्छुक नातेवाईक यांना अवयवदानाची मान्यता देण्याचे अनुषंगाने प्रस्थापित कायद्यात बदल / सुधारणा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची याबाबतची नेमकी भूमिका."

**(६)** **डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री धीरज लिंगाडे, अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील भटक्या व विमुक्त जाती जमाती अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष सुरू होताच जुन महिन्या दरम्यान मिळणारे ४०% व ६०% अनुदान अद्याप मिळालेले नसणे, या महाविद्यालयांना अद्याप अनुदान न मिळाल्याने या संस्था आर्थिक विवंचनेत असणे, अनुदाना अभावी या शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन रखडलेले असणे, तसेच या महाविद्यालयांमध्ये भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयातील प्राध्यापकांची पदे अनेक वर्षे रिक्त असणे, या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होत असणे, शासनाकडून भटक्या व विमुक्त जाती जमाती अंतर्गत या महाविद्यालयांना अनुदान मिळत नसल्याने येथील ही पदे भरणे महाविद्यालयांना दुरापास्त झालेले असणे, या सर्वांचा परिणाम या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असणे, भटक्या व विमुक्त जाती जमाती महाविद्यालयांना अनुदान मिळावे आणि भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र ही रिक्त असलेली पदे तातडीने भरावी याबाबत विद्यार्थी व संस्थेकडून सातत्याने शासनाकडे मागणी होत असणे, अद्याप या मागणीबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नसल्याने विद्यार्थी व संस्थाचालकांमध्ये शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, भटक्या व विमुक्त जाती जमाती महाविद्यालयांमध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांची भरती तातडीने करण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा — (पहिला दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** उप मुख्यमंत्री (गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा)
**२)** उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन)
**३)** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री
**४)** सहकार मंत्री
**५)** वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री
**६)** उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री
**७)** ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री
**८)** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री
**९)** उद्योग मंत्री
**१०)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री
**११)** अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री
**१२)** गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री
**१३)** राज्य उत्पादन शुल्क मंत्री
**१४)** महिला व बालविकास मंत्री

**सात : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अप्रकाशित प्रत

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३, बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३, गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ व शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२१ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री विक्रम काळे,** प्रविण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, निलय नाईक, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील "पंचामृत" संकल्पनेत "शाश्वत शेती — समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरु ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरु करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी

अप्रकाशित प्रत

हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची" स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन—२०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेच्या धर्तीवर "मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर" हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी "काजू फळपिक विकास योजना" लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा

अग्रिम प्रत

काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

(ख) **(गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ व शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, जयंत पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, कपिल पाटील, किशोर दराडे, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** — **(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)** —

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट

अप्रकाशित

कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे, राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता असणे, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना-नांदेड महामार्गाचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड- लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्याना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड-औरंगाबाद- परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली 'दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, राज्यात वाढलेला वीज दर, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना

अप्रकाशित प्रत

संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या व अंगणवाडी सेविकांचा पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्याच्या शिक्षणाचा दर्जा खालावला असणे, राज्यात कोयता गँगची वाढलेली दहशत, सोशल मिडीयावर लोकांना धमक्या देण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा मध्यम वर्गाला होणारा त्रास, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, बार्टी, महाज्योती व सारथी विभागाच्या गलथान कारभारांमुळे लाखो विद्यार्थी प्रशिक्षणा पासून वंचित रहाणे पर्यायाने त्यांचे शैक्षणिक व रोजगार संदर्भात नुकसान होणे, ग्रामपंचायत व जिल्हापरिषदेच्या निवडणूका घेण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या थकीत मागण्या, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे ४० हजार कोटी येणे बाकी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या कामाचे अद्यापही पैसे न मिळणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, राज्य सरकारने पुरवणी मागणी व अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विविध खात्यामध्ये जाहीर केलेली तरतूद तथापि प्रत्यक्षात निधी मिळण्यास होत असलेला विलंब, त्याची पुर्तता करण्यास आलेले अपयश, विविध विकासकामांना मंजूरी तथापि निधी अभावी कामे प्रलंबित असणे, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री रमेशदादा पाटील, निलय नाईक, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात पुणे जिल्ह्यातील कामशेत तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागातील नेसावी गावामध्ये हिरव्या चाऱ्याच्या शोधात आलेल्या जंगली प्राण्यांनी शेतावरील रोपवाटिका खाल्ल्यामुळे शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले असल्याची बाब माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, यामुळे येथील शेतकऱ्याला भात लागवडीसाठी रोपे दुसऱ्याकडून विकत आणावी लागत असणे, जंगली व पाळीव प्राण्यांपासून शेती पिकाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना शेताला कुंपण घालणे आवश्यक असणे, सदर तार कुंपण बांधणे महागडे असल्याने शेतकऱ्यांसाठी

शासनाच्यावतीने तार कुंपण योजनेंतर्गत मागासवर्गीय वर्गात ९० टक्के तर खुल्या वर्गासाठी ७५ टक्के अनुदानाची व्यवस्था आहे मात्र ही महत्त्वाकांक्षी योजना अद्याप कागदावरच असणे, सह्याद्री डोंगररांगाच्या कुशीत वसलेल्या खांडशी, नेसावे, उंबरवाडी, थोरण, जांभवली, उकसान, पाले, शिरदे आदी गावांमध्ये वन्य प्राण्यांचा नेहमीच वावर असून हिंसक प्राण्यामुळे या गावातील रहिवाशी नेहमीच दहशती खाली वावरत असणे, वन्यप्राण्यांमुळे येथील बागायती शेतीचे होणारे नुकसान एक चिंतेची बाब असून शासनस्तरावर या भागांमध्ये उपाययोजना होणे गरजेचे असणे, शासनाने पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी, शेतकऱ्यांना काटेरी कुंपण देण्यासाठी तात्काळ अनुदान देण्याची मागणी कोकणकडा लगत असणाऱ्या या प्रदेशामधील शेतकऱ्यांकडून होत असणे, यावर शासनाने याबाबत करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री रमेशदादा पाटील,** प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात ठाणे जिल्ह्यातील ठाणे बेलापूर टीटीसी एमआयडीसी या औद्योगिक नगरीतील दिघ्याच्या मुकुंदपासून ते नेरूळ पर्यंतच्या कोट्यवधी रुपये किमतीच्या ३०० ते ४०० एकर क्षेत्रफळाच्या मोकळ्या जागांवर डेब्रिजचे डोंगर, भंगाराच्या गोदामासह शेकडो अनधिकृत झोपड्यांचे अतिक्रमण झालेले असणे, महापे औद्योगिक परिसरातील एकूण सातशे एकर भूखंडात एकही वाहनतळ नसल्याने वाहतुकीच्या रस्त्यांच्या दुतर्फा वाहनांची दाटीवाटीने अवैध पार्किंग केली जात असणे, महापे जंक्शन जवळील एमआयडीसीच्या विद्युत उपकेंद्राच्या (हायटेन्शन) उच्चदाब वायरखाली भंगार गोदामांचा सुळसुळाट असणे, या गोदामांची भूमाफियांकडून दरमहा भाडे वसुली करण्यात येत असणे, अनेक ठिकाणी गटारे बांधण्याचे काम सुरू असून त्यांचे सांडपाणी रस्त्यावर येत असणे, त्याकडे एमआयडीसी प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असणे, यामुळे स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून नाराजी व्यक्त करण्यात येत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद